**सहकारी पतसंस्था व नागरी बँका संबंधाने झालेल्या आंदोलनाबाबत सरकारशी केलेला पत्रव्यवहार व आंदोलन याबाबत माहीती:**

| अ.क्रं | आंदोलना संबंधाने सरकारशी केलेला पत्रव्यवहार व तारीख | आंदोलना संदर्भाने चर्चा करण्यासाठी सरकारच्या वतीने आलेले अधिकारी किंवा पदाधिकारी | आंदोलन स्थगितीसाठी सरकारने दिलेले आश्वासन |
|---|---|---|---|
| १. | दि. ०५ जुन २००७ रोजी सहकार मंत्री मा.ना. पतंगराव कदम यांना दि. १५ ऑगष्ट २००७ स्वातंत्र्य दिनापासून आंदोलन करण्याबाबत पत्र | दि. २८.०७.२००७ सहकार सचिव मा. रत्नाकर गायकवाड, मा. सहकार आयुक्त साखर आयुक्त यांचे बरोबर यशदा पुणे याठिकाणी बैठक<br>**सरकारला कार्यवाही करण्यासाठी ३ महिन्यांची मुदत देवून आंदोलन स्थगित.** | १. सहकार विभागाने माहीतीच्या अधिकारा संदर्भाने काढलेल्या परिपत्रका बाबत पुर्नविचार केला जाईल<br>२. अडचणीत आलेल्या व बंद पडलेल्या पतसंस्थांची जिल्हानिहाय यादी तयार करून यासाठी जबाबदार असणाऱ्या लोकांवर साम, दाम, दंड, भेद मार्गांचा अवलंब करण्यात येईल. व त्याचा आढावा घेण्यासाठी एक स्वतंत्र कक्ष तयार करण्यात येईल.<br>३. क व ड वर्गातील पतसंस्थांचा आढावा जिल्हा व विभागीय स्थरावर घेण्यात येईल. ड वर्गातील पतसंस्थांचे सक्षम पतसंस्थां मध्ये विलीनीकरण करण्यात येईल. तसेच क वर्गातील पतसंस्थांना योग्य मार्गदर्शन करून दर्जा सुधारण्याकरीता मदत केली जाईल.<br>४. पतसंस्था व नागरी बँका यांच्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीकोनातुन त्या संस्थांचे फेडरेशन सोबत लवकरच बैठक बोलविण्यात येईल. त्यात मा. अण्णा हजारे यांनाही निमंत्रित करण्यात येईल.<br>५. डिपॉजिट गॅरंटी कार्पोरेशन मध्ये शासनाचाही सहभाग असावा यासाठी सहकार खात्यामार्फत शासनाकडे पाठपुरावा केला जाईल.<br>६. पतसंस्थांसाठी विभागीय स्थरावर टास्क फोर्स निर्माण करण्यात आले असल्याचे सहकार आयुक्त यांनी सांगितले.<br>७. अडचणीत असलेल्या पतसंस्थांसाठी ३ महिन्यात मार्ग काढण्यासाठी सहकार खाते धडक मोहीम हाती घेईल. त्या संदर्भाने ३१.०७.२००७ रोजी सर्व विभागीय सह निबंधकांची बैठक बोलविण्यात आली आहे.<br>८. पतसंस्था आणि नागरी बँकांच्या कारभारामध्ये पारदर्शकता आण्यण्यासाठी व भ्रष्टाचार मुक्त कारभार चालविण्यासाठी सहकार खाते विशेष लक्ष देईल.<br>**दि. ०७ ऑगष्ट २००७ च्या शासन निर्णयाप्रमाणे अडचणीत आलेल्या सहकारी पतसंस्था व नागरी बँका या संबंधाने करावयाच्या कार्यवाहीसाठी मा. रत्नाकर गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृती समिती स्थापन करण्यात आली.** |
| २. | दि. २७ सप्टेंबर २००७ रोजी सहकार मंत्री मा.ना. पतंगराव कदम यांना दि. १६ नोव्हेंबर २००७ स्वातंत्र्य दिनापासून आंदोलन करण्याबाबत पत्र | दि. १२ नोव्हेंबर २००७ रोजी सहकार मंत्री मा. ना. पतंगराव कदम, कृती समितीचे अध्यक्ष मा. रत्नाकर गायकवाड, सहकार सचिव मा. डॉ. सुधीरकुमार गोयल, सहकार सचिव मा. अनिल डिग्गीकर यांचे समवेत मंत्रालय, मुंबई या ठिकाणी चर्चा | **चर्चेच्या वेळी दिलेली प्रमुख आश्वासने:**<br>१. गोरगरीब जनतेच्या ठेवी त्यांना परत देण्या संदर्भाने निर्णय घेण्याचे सर्व अधिकार सहकार सचिवांना देण्यात आले. तसेच याबाबतीत कुणालाही पाठीशी न घालता अत्यंत ठामपणे कारवाई करण्यात येईल.<br>२. पतसंस्थांची वसुली, केसेस दाखल करणे, बोजा असलेल्या मालमत्तेची विक्री होऊ न देणे इ. प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरिक्षक व इतर लोकांची समन्वय समिती स्थापन करण्यात येईल.<br>३. राज्यस्तरीय विचारमंचची स्थापना करून त्यात पतसंस्था चळवळीतील विचारवंत व विविध क्षेत्रातील विचारवंत तसेच मा.अण्णा हजारे यांचेकडील प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | संबंधीत विचारमंच प्रशासकीय यंत्रणेला वेळोवेळी सूचना देणे , कायद्यात बदल सूचविणे इ. महत्वाची भूमिका पार पाडील.<br>४. पतसंस्थेतील चुकीचे कर्जवाटप, विनाकारण कर्जवाटप, अपुरे तारण कर्जवाटप या बाबी गंभीर समजून तक्रार केल्यास ती दाखल करून घेण्याबाबतच्या सूचना देण्याविषयी परिपत्रक काढण्यासंबंधी गृह विभागास सांगण्यात येईल.<br>५. मोठ्या व प्रभावशाली कर्जदार व कर्ज घेवून ते न भरणारे संचालक यांच्याविरूध्द धडक मोहीम उघडण्यात येईल.<br>६. मोठ्या ठेवीदारांच्या ठेवी परत केल्या असतील त्यांची तात्काळ चौकशी करून संबंधीतांविरूध्द कारवाई करणे व कुठल्याही परिस्थितीत छोट्या ठेवीदारांच्या ठेवी पतर केल्या जातील याबाबत वैयक्तिकरित्या विभागीय सहनिबंधक यांनी लक्ष देण्याचे आदेश काढण्यात आले. तसेच होणाऱ्या कार्यवाहीमध्ये राजकीय हस्तक्षेप केला जाणार नसल्याचेही मा. सहकार मंत्री यांनी सांगितले.<br>**मा. सहकार मंत्री यांचे विनंती वरून आंदोलन स्थगित** |
| ३. | दि. १९ डिसेंबर २००७ रोजी मुख्यमंत्री मा. ना. विलासराव देशमुख यांना दि. १५ जानेवारी २००८ पासून आंदोलन करीत असल्याबाबतचे पत्र | दि. ०७ जानेवारी २००८ रोजी साखर संकुल पुणे याठिकाणी मा. रत्नाकर गायकवाड, सहकार आयुक्त अनिल डिग्गीकर व सर्व विभागीय सह निबंधक, ठेवीदार संघटनांचे प्रतिनिधी, पतसंस्था फेडरेशनचे पदाधिकारी, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे कार्यकर्ते यांच्या सोबत बैठक, तसेच १३ जानेवारी २००८ रोजी राळेगणसिध्दी याठिकाणी मा. सहकार सचिव डॉ. सुधीरकुमार गोयल, मा. सहकार आयुक्त अनिल डिग्गीकर यांचेसमवेत बैठक व चर्चा | सदर बैठकीत राज्यातील सर्व जिल्ह्यामधील अडचणीतील पतसंस्था व त्या संबंधाने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा तपशिल विभागवार देण्यात आला.कलम ८८ अन्वये चालू असलेल्या चौकशांना स्थगिती देण्यात येऊ नये ही प्रमुख मागणी मा. अण्णा हजारे यांनी केली, तसेच अडचणीतील पतसंस्था सक्षम पतसंस्थेने विलीनीकरण करून घेतल्या असल्यास अशा प्रकारच्या कारवाईला स्थगिती देऊ नये असेही नमुद केले.<br>झालेल्या चर्चेतील महत्वाचे निर्णय:<br>१. अडचणीत असलेल्या पतसंस्थेतील गरजू ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याकरिता पुढील तीन महिन्यांसाठी एक कालबध्द कार्यक्रम राबविण्यात येईल.<br>२. प्रत्येक जिल्ह्यात जेथे अशा अडचणीत असलेल्या संस्थांची संख्या जास्त आहे तेथे जिल्हा उपनिबंधक यांचे मार्गदर्शनखाली ठेवीदारांचे प्रतिनिधी संबंधीत संस्थाचालक, सहाय्यक निबंधक व मा. अण्णा हजारे यांचे कार्यकर्त्यांसह दर सोमवारी अडचणीत असलेल्या संस्था व ठेवीदारांची ठेवी परत करण्यासंबंधी आढावा घेतला जाईल.<br>३. प्रतिनिधी कार्यकर्ते अडचणीत असलेल्या ठेवीदारांची नावे व धनदांडग्या कर्जदारांची माहीती देतील व त्या माहीतीवर तात्काळ पुढील कार्यवाही करून एका आठवड्यात अहवाल आयुक्त सहकार यांचे मार्फत मा.अण्णा हजारे यांचे निदर्शनास आणण्यात येईल.<br>४. कमकुवत संस्थांना मदतीकरिता चांगल्या संस्थांबरोबर त्यांचे गट तयार करून कर्जदार व ठेवीदार यांचे पालकत्व स्विकारून कर्जदारांना नवीन कर्ज चांगल्या संस्थेकडून उपलब्ध करून तसेच ठेवीदारांच्या ठेवी पतसंस्थांना कर्ज देऊन परत केल्या जातील.<br>५. वरील कार्ययोजनेत अडचणीवर मात करण्यासाठी राज्य शासनातर्फे वसुलीसह पर्यायी मार्ग शोधुन उरलेल्या सुमारे दीड लाख ठेवीदारांना रू. १०० कोटी ठेवी परत करण्याकरिता अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यावर विचार केला जाईल.<br>६. भविष्यकाळात ही परिस्थिती उद्भवणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपायोजना करण्यासंबंधी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पुढील तीन महिन्यात निर्णय घेण्यात येतील.<br>७. ज्या लेखापरिक्षक/सी.ए. यांनी पतसंस्थांचे लेखापरिक्षण करताना कसुर केली असेल त्यांच्यावर दंडात्मक प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.<br>**दि. १४ जानेवारी २००८ रोजी राज्यातील नागरी सहकारी बँका व सहकारी पतसंस्था मधील गैरव्यवस्थापन व गैरव्यवहारा संबंधी कार्यवाही करताना पोलीस संरक्षण व फौजदारी कामी सहकार्य करणेबाबत गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून परिपत्रक काढण्यात आले. तसेच सरकारच्या विनंतीला मान देऊन आंदोलन स्थगित.** |
| ४. | दि. ०४ मार्च २००८ रोजी मा. सहकार सचिव डॉ. सुधीरकुमार गोयल यांना दि. १ एप्रिल २००८ पासून आंदोलन करीत असल्याबाबतचे पत्र | दि. २९ मार्च २००८ रोजी सहकार आयुक्त यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं. ५५३/०८ ने अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांच्या ठेवी ठेवीदारांना परत करण्याचे अनुषंगाने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत कळविले. आहे. या संबंधाने सहकार आयुक्त यांनी दि. ३१ मार्च २००८ रोजी राळेगणसिध्दी येथे येवून चर्चा केली. | १. सदर पत्रात अडचणीत आलेल्या ४६२ पतसंस्थापैकी ८६ पतसंस्थांवर फौजदारी कार्यवाही केल्याचे सांगितले.<br>२. १०० कोटी रूपयांच्या कर्जाची वसुली करण्यात आली .<br>३. हार्डशिप केसेस मधील १०२ कोटी रुपयांच्या ठेवींचे वाटप<br>४. दोषी लेखापरिक्षकांवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत असल्याचे नमुद केले.<br>५. अडचणीतील पतसंस्थांचे सक्षम पतसंस्थामंध्ये विलीनीकरण करण्याची कार्यवाही चालू असून पैकी काही कर्जे व ठेवी सुरक्षित केले असल्याची माहीती.<br>**सदर पत्रानुसार दि. १ एप्रिल २००८ पासून पुकारलेले आंदोलन स्थगित** |
| ५. | दि. १२ एप्रिल २००८ रोजी मा. सहकार सचिव डॉ. सुधीर कुमार गोयल यांना दि. १ मे २००८ (महाराष्ट्र दिन) पासून आंदोलन करीत असल्याचे पत्र | दि. ३० एप्रिल २००८ रोजी सहकार सचिव मा. डॉ. सुधीरकुमार गोयल, सहकार आयुक्त मा. अनिल डिग्गीकर यांची राळेगणसिध्दी याठिकाणी चर्चा | सहकार सचिव यांनी दि. ३० एप्रिल २००८ रोजी दिलेले पत्र<br>१. १०८ कोटी रुपयांच्या ठेवींचे वाटप<br>२. अडचणीतील पतसंस्थांच्या १५०० संचालकांवर कारवाई करण्यात आली असुन कलम ८८ खाली ३५५ संचालकांवर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. १९५ संचालकांची जबाबदारी कलम ८३ खाली निश्चित करून अंतिम करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.<br>३. अडचणीतील ४६२ पतसंस्थांपैकी २९२ पतसंस्थांचे लेखापरिक्षण विशेष पथक नेमुन पुर्ण करण्यात आली असुन त्यातील ९४ संस्थांमध्ये गंभीर दोष आढळून आले असल्याने फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. या प्रकारे ७०० संस्था चालकांवर कार्यवाही झालेली आहे.<br>४. दोषी १९६ खाजगी लेखापरिक्षकांवर कार्यवाही करण्यासाठी विशेष मोहीम उघडण्यात आलेली आहे.<br>५. अडचणीतील पतसंस्थांच्या ९१० कोटीच्या कर्जापैकी १५१ कोटींचे कर्ज सक्षम पतसंस्थांकडे वर्ग करण्यात आलेले आहे.<br>६. ९४ पतसंस्थांविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल झालेला असून सुमारे १४७१ संस्थाचालकांवर गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.<br>७. संचालक मंडळाच्या सदस्यांना संस्थेच्या कार्यक्षेत्राप्रमाणे ठेवी ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.<br>८. नविन संस्था नोंदणीवर कडक निर्बंध लादण्यात आलेले आहेत.<br>९. पतसंस्थांचे संपुर्ण संगणीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे.<br>**सदर पत्रानुसार मा. सहकार सचिव यांनी केलेल्या विनंती नुसार १ मे २००८ पासून सुरू** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | होणारे आंदोलन स्थगित करण्यात आले. |
| ६. | दि. १ ऑगष्ट २००८ रोजी मा. सहकार सचिव डॉ. सुधीर कुमार गोयल यांना दि. १५ ऑगष्ट २००८ (स्वातंत्र्य दिन) पासून आंदोलन करीत असल्याचे पत्र | दि. १३ ऑगष्ट २००८ रोजी वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी बैठक, मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री मा.ना. आर.आर.पाटील व मुख्य सचिव , सहकार सचिव व सहकार आयुक्त इ. यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक | या प्रकरणात रु. ९७० कोटी गरीब ठेवीदारांच्या ठेवी अडकलेल्या असुन फक्त रु. १०८ कोटी वसूल झालेले आहेत.<br>या ठेवीदारांचा निधी शासनाने परत करुन नंतर तो वसुल शासनातर्फे करण्यात यावा.<br>किमान अतिशय गरजु लोकांना ठेवी परत करण्यासाठी काही प्रमाणात बिनव्याजी कर्ज, ज्या चांगल्या पतसंस्थांवर मोठ्या प्रमाणावर त्यांच्या ठेवी काढुन घेण्यामुळे अडचणीत आल्या आहेत त्यांना देण्यात यावे. दिवाळीपुर्वी याबाबत मार्ग काढावा.<br>सभेतील निर्णय:<br>१)याबाबत सहकार विभागाकडुन करण्यात आलेली कार्यवाही विशद करण्यात आली. खातेदारांना सुमारे रू. २०० कोटीच्या ठेवी परत करण्यात आल्या आहेत. विभागातील संबंधीत अधिकारी, लेखापरिक्षक, व चार्टर्ड अकाऊंटट यांचेविरूध्द केलेल्या कार्यवाहीबाबत माहीती देण्यात आली.<br>२) याबाबत आणखी प्रयत्न करुन जास्तीत जास्त वसूली करण्यात यावी. यासाठी आवश्यक ती मदत महसुल व गृह विभागाने सहकार विभागाला करावी.<br>३) जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक, व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे जिल्हानिहाय स्कॉड वसुली व नियंत्रण करण्या करिता नेमण्यात यावेत.<br>४) महसुल विभागाने मालमत्ता जप्त करण्यासाठी आवश्यक सहकार्य सहकार विभागाच्या संबंधीत अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन द्यावे.<br>५)वसूल झालेली रक्कम कमी उत्पन्न गटातील ठेवीदारांना प्राधान्याने परत करण्यात याव्यात.<br>**मा. मुख्यमंत्री यांनी केलेल्या विनंतीनुसार आंदोलन स्थगित** |
| ७. | दि. ०५ जानेवारी २००९ रोजी मा. सहकार मंत्री ना. हर्षवर्धन पाटील यांना दि. २६ जानेवारी २००६ (प्रजास्ताक दिन ) पासून आंदोलन करीत असल्या बाबत पत्र | मा. सहकार आयुक्त यांनी २३ जानेवारी २००९ रोजी राळेगणसिध्दी याठिकाणी भेट घेतली. | आंदोलनातील मागण्यासंदर्भाने राज्यस्तरावर मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली व इतर सर्व प्रमुख संबंधीत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दि. ०३ फेब्रुवारी २००९ रोजी सह्याद्री अतिथीगृह याठिकाणी बैठक घेण्यात येईल असे सांगण्यात आले.<br>त्यानुसार २६ जानेवारी २००९ पासून सुरू होणारे आंदोलन स्थगित करण्यात आले.<br>दि. ०३ फेब्रुवारी २००९ रोजी चर्चा झालेले मुद्दे:<br>१. अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये ठेवी परत करण्याकरीता महसुल व गृह विभागाची मदत घेवून कर्ज वसुली, ठेवीदारांच्या ठेवी परत करणे वठेवी सुरक्षित करणे याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. ३४८ कोटीच्या ठेवी परत किंवा सुरक्षित केलेल्या आहेत. तसेच १९७.७७ कोटी रू. च्या कर्जाची वसुली करण्यात आलेली आहे. अडचणीतील पतसंस्थांचे सक्षम पतसंस्थांमध्ये विलीनीकरण करून १८९ कोटी रू.च्या ठेवी सुरक्षित करण्यात आलेल्या असुन त्या व्यतिरीक्त १५९ कोटी रूपयांच्या ठेवी सुरक्षित किंवा वाटप करण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली असल्याचे सांगितले.<br>**मा. सहकार आयुक्त श्री. कृष्णा लव्हेकर यांच्या विनंतीवरून आंदोलन स्थगित** |
| ८. | दि. ०७ मार्च २००९ रोजी मुख्यमंत्री मा. ना. अशोक | दि. २६ मार्च २००९ रोजी राळेगणसिध्दी याठिकाणी सहकार सचिव, नियोजन | सहकारी पतसंस्था व नागरी सहकारी बँकामध्ये ठेवीदारांना ठेवी परत करण्याकरीता राज्य शासनाने निश्चित निधी या संस्थांना उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी पुन्हा करण्यात आली. |

| | | | |
|---|---|---|---|
| | चव्हाण यांना दि. २७ मार्च २००९ पासून आंदोलन करीत असल्याबाबतचे पत्र | सचिव, जलसंधारण सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव यांच्या उपस्थितीत महत्वाची बैठक | **मा. सहकार सचिव इतर अधिकाऱ्यांच्या विनंतीवरून कार्यवाही साठी सरकारला मुदत देण्याचे ठरून आंदोलन स्थगित.**<br>**तसेच या संबंधाने दि. २३ मे २००९ रोजी सह्याद्री राज्य अतिथीगृह याठिकाणी बैठक झाली त्यामध्ये खालील माहीती देण्यात आली.**<br>अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये ठेवी परत करण्याकरीता महसुल व गृह विभागाची मदत घेवून कर्जवसुली, ठेवीदारांच्या ठेवी परत करणे व ठेवी सुरक्षित करणे याबाबत कार्यवाही करण्यात येत असुन आज पर्यंत ३५२ कोटी रूपयांच्या ठेवी परत / सुरक्षित करण्यात आलेल्या आहेत. तसेच अडचणीतील पतसंस्थांमधील कर्ज वसुलीसाठी राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहीमे अंतर्गत रू. २०१ कोटींची कर्ज वसुली करण्यात आली आहे.<br>तसेच अडचणीतील ४६२ पतसंस्थांपैकी ७० पतसंस्था अडचणीतुन बाहेर आल्यामुळे त्या पतसंस्थेमध्ये रू. ४३७१.१५ लाखांची ठेवी सुरक्षित करण्यात आले आहेत. |
| ९. | दि. ३१ मे २००९ रोजी मुख्य सचिव मा. जॉनी जोसेफ यांना दि. १ ऑगष्ट २००९ पासून आंदोलन करीत असल्या बाबतचे पत्र | दि. २८ जुलै २००९ रोजी सह्याद्री राज्य अतिथीगृह ,मलबार हिल, मुंबई याठिकाणी मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री संबंधीत खात्याचे मंत्री, सचिव यांचे समवेत बैठक | आतापोवेतो ठेवीदारांच्या ४२५ कोटीच्या ठेवी परत करण्यात आल्याचे प्रधान सचिव,सहकार यांनी बैठकीच्या वेळी निदर्शनास आणून दिले. अद्यापही ११०० कोटी रूपये इतकी रक्कम वसूल होणे बाकी असुन त्याबाबत विभागाकडून संपुर्ण प्रयत्न करण्यात येत असल्याचे निदर्शनास आणून दिले. या ठेवीदारांना राज्य शासनाने सॉफ्ट लोन उपलब्ध करून द्यावे ही श्री. अण्णा हजारे यांची मागणी मान्य करणे न्यायोचित होणार नाही ही बाबत्यांनी निदर्शनास आणून दिली. ठेवी बुडविणाऱ्या सर्व पतसंस्थांमध्ये चार्टर्ड अकाऊंटांमार्फत तपासण्या करण्यात येत होत्या असेही सचिवांनी सांगितले. या प्रकरणी ७०० संचालकांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आल्याचे व दोषी चार्टर्ड अकाऊंटंट विरूध्द कारवाई करण्यासाठी संबंधीत संस्थेस कळविण्यात आले आहे. ( तसेच विधवा, पेन्शनर्स व दारिद्रय रेषेखालील ठेवीदारांच्या बाबतीत शासनाने सहानुभती दाखवावी याबाबत उचित विचार करण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.)या प्रकरणी गृह विभागाच्या सहकार्याने आणखी कठोर कायदे करण्यासाठी आवश्यक पावले उचलण्यात यावी अशा सूचना आयुक्त सहकार यांना दिल्या.<br>दि. ४ ऑगष्ट २००९ च्या शासननिर्णयात सुधारणा करून परित्यक्त्या हा शब्द घालून शुध्द पत्रक निर्गमित करण्यात आले आहेत.<br>सहकारी कायदा नियम ३० अन्वये संस्थेचे सदस्यास वा कोणत्याही व्यक्तीस माहीती मिळविण्यासाठी अर्ज करण्याची तरतुद आहे.<br>**त्यामुळे दि. १ ऑगष्ट २००९ पासून सुरू होणारे आंदोलन स्थगित** |
| **१०.** | दि. ०८ फेब्रुवारी २०१० रोजी मुख्यमंत्री मा. ना. अशोक चव्हाण यांना दि. १५ मार्च २०१० (गुढीपाडवा) पासून आंदोलन करीत असल्या बाबतचे पत्र | दि. १५ मार्च २०१० (गुढीपाडवा ) पासून श्री. संत यादवबाबा मंदीर, राळेगणसिध्दी याठिकाणी उपोषण सुरू.<br>दि. १९ मार्च २०१० रोजी मुंबई याठिकाणी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व प्रधान सचिव वित्त, प्रधान सचिव सहकार, प्रधान सचिव सामान्य प्रशासन, प्रधान | दि. २० मार्च २०१० रोजी दिलेली आश्वासने:<br>१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ यामध्ये व्यापक प्रमाणावर बदल करण्याची आवश्यकता असल्याने महाराष्ट्र शासनाने तज्ञ व्यक्तींची समिती नेमुन कायद्यामध्ये पुढील कालावधीमध्ये सहकारी चळवळीला मार्गदर्शक ठरेल असे बदल सुचविण्यात येतील. त्याचप्रमाणे केंद्र सरकार राज्य घटनेमध्ये घटना दुरूस्ती करत आहे. त्याला सुसंगत आणि भारतातील सहकार चळवळीला मार्गदर्शक ठरेल अशी कायदा दुरूस्ती करण्यात येईल. समिती मध्ये मा.अण्णा हजारे यांच्या चळवळीशी संबंधीत १-२ व्यक्तींचा समावेश राहील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सचिव राजशिष्टाचार, सचिव परिवहन, प्रधान सचिव सामाजिक न्याय, मुख्य सचिव , जलसंपदा मंत्री मा.ना. रामराजे निंबाळकर, सहकार मंत्री मा.ना. हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीत बैठक झाली.<br>सदर बैठकीनंतर दि. २० मार्च २०१० रोजी राळेगणसिध्दी येथे दि. १९ च्या बैठकीत ठरलेले निर्णय कळविण्यासाठी सहकार मंत्री, मा. ना. हर्षवर्धन पाटील, जलसंपदामंत्री मा.ना.रामराजे निंबाळकर, आदिवासी विकास मंत्री व अहमदनगरचे पालकमंत्री मा. ना. बबनराव पाचपुते, सहकार सचिव डॉ. सुधीरकुमार गोयल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर, सहकार आयुक्त मा. श्री. राजगोपाल देवरा यांची बैठक | २. सद्य स्थितीमध्ये महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्था चळवळीला नियंत्रणात्मक तरतुदी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियममाध्ये करण्यासाठी सहकार आयुक्तांनी त्यांच्या पातळीवर नेमलेल्या समितीने सुचविलेल्या दुरूस्त्यांचा मसुदा शासनास सादर केला आहे. त्या मसुद्याचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी मसूदा एक महिन्यात मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात येईल. त्याचप्रमाणे सहकारी पतसंस्थांसाठी संगणकीकरण आणि नियामक मंडळ यांची यंत्रणा उभी करण्यात येईल<br>३. महाराष्ट्र राज्यातील अडचणीतील पतसंस्थांच्या कर्ज वसुलीचा विचार करता,जिल्हा पातळीवरील आणि राज्य पातळीवरील फेडरेशन्स आणि बँकांचे असोसिएशन यांच्या पातळीवर पोलीस विभागाने विशेष कक्ष नेमुन त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी,अधिकारी वर्ग उपलब्ध करून देण्यात येईल आणि त्यांची आस्थापना खर्च व अनुषंगिक जबाबदारी पतसंस्था फेडरेशन्स आणि बँक असोसिएशन्स यांच्याकडे सोपविण्यात येईल. थकीत कर्ज वसुलीसाठी याचा वापर प्रभावीपणे करण्यात येईल.<br>४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१,९१,९८,१०५ आणि १३७ याप्रमाणे देण्यात आलेल्या वसुलीचे दाखले अंमलबजावणी करण्यासाठी आणि वसुलीच्या दाखल्याप्रमाणे जबाबदार व्यक्ती आणि त्यांचे कुटूंबीय यांच्या मालमत्तेवर कायदेशीर बाजूचा अभ्यास करून बोजा चढविण्यात येईल. त्यासाठी आवश्यकता भासल्यास महसूल विभाग शासन निर्णयाद्वारे यंत्रणेला सूचना देतील.<br>५. महाराष्ट्र शासनाने रू. २०० कोटी अडचणीतील पतसंस्थांच्या पात्र ठेवीदारांना रू. १०,०००/- प्रमाणे परत करण्यासाठी देण्यात आलेले कर्जरूपी अर्थसहाय्य यापैकी रू. ३२.७९ कोटी रक्कम खर्ची पडल्यानंतर उर्वरीत रक्कम सहकार विभागाकडे उपलब्ध करून देण्यात येईल. त्याचा विनीयोग अडचणीतील पतसंस्थांच्या अल्प आणि अत्यल्प उत्पन्न गटातील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी करण्यात येईल. त्यासाठी स्वतंत्र निकष व यंत्रणा चर्चा करून उभी करण्यात येईल. योजनेचा प्राथमिक मसूदा परिशिष्टाप्रमाणे राहील.<br>६. सहकार विभागाने शासन पातळीवर देण्यात आलेल्या स्थगितीचे निर्णय सुनावणी देऊन पुढील दोन महिन्यात नैसर्गिक न्यायाचे तत्व सांभाळून अंतिम निर्णय घेण्यात येईल.<br>तसेच या संबंधाने कृती आराखडा तयार करण्यात आला :<br>१. शासनाने जाहीर केलेल्या रू. २०० कोटीच्या पॅकेजपैकी उर्वरीत १६८ कोटी वित्त विभागाने सत्वर उपलब्ध करून देणे.<br>२. हा निधी सहकार आयुक्त, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे त्यांच्या अकाऊंटमध्ये तात्काळ सुपुर्त करणे.<br>३. तालुका स्तरावर सहाय्यक निबंधक, ऑडीटर व श्री. अण्णा हजारे प्रणित संघटनेच्या प्रतिनिधींची समिती स्थापित करणे.<br>४. त्या तालुक्यातील सर्व प्रलंबित ठेवींपैकी अत्यंत अडचणीतील ठेवीदारांचा ह्या समितीने शोध घेणे.<br>५. रू. १०,०००/- पेक्षा जास्त नाही व ज्यांना त्यापेक्षा कमी ठेवी परत मिळालेल्या आहेत त्यांनाच लाभ देणे.<br>६. एकंदर पॅकेज चे प्रमाणे रू. २०० कोटी पर्यंत मर्यादित ठेवून एकूण प्रलंबित ठेवींवर लिमीट ठरवून देणे.<br>७. तालुका युनिट धरून एक तालुक्यात मर्यादेत प्रलंबित ठेवीपैकी जास्त ठेवी परत न करता संस्था निहाय याद्या तयार करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ८. तालुका समितीच्या प्रस्तावाला अंतिम मान्यता जिल्हाधिकारी यांच्या समिती मार्फत देणे.<br>९. जिल्हाधिकारी यांच्या समितीमार्फत निश्चित करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार सहकार आयुक्त यांनी निधीचे वितरण तात्काळ करणे.<br>१०. सदरची प्रक्रिया ३१ जुलै २०१० पर्यंत पुणे करणे.<br>११. जिल्ह्यातील महसुल,गृह व सहकार विभागाच्या वरीष्ट अधिकाऱ्यांची बैठक बोलविणे व त्यात पतसंस्थांची वसुली प्रभावीपणे करण्यासाठी उपाय योजना निश्चित करणे<br>**दि. २० मार्च २०१० रोजी ग्रामसभेमध्ये आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय** |
| **११.** | दि. २५ मे २०१० रोजी मा. मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांना दि. १ जुन २०१० पासून मौन आंदोलन करीत असलेबाबतचे पत्र | दि. १ जून २०१० रोजीचे दि. ७ जून २०१० ला प्राप्त झालेले मा. सहकार सचिव डॉ. सुधीरकुमार गोयल यांचे पत्र | सहकार विभाग तातडीने कार्यवाही करीत असल्याचे व मौन आंदोलन मागे घेण्याविषयी विनंती पत्र<br>**तथापी मौन सुरूच** |
| **१२.** | दि. २० जून २०१० रोजी मा. सहकार सचिव डॉ.सुधीरकुमार गोयल यांना जुलै मध्ये आंदोलन करीत असल्याबाबत चे पत्र | | |